ISSN 2319 - 359X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# IDEAL

Volume - XII Issue - II March - August - 2024

MARATHI PART - I

**Peer Reviewed Referred and**
**UGC Listed Journal No. 47026**

**Single Blind Review/Double Blind Review**

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING**
**2023 - 7.537**
**www.sjifactor.com**

❖ EDITOR ❖
**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"IDEAL"**. Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Published by**

Ajanta Prakashan, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

Cell No. : 9579260877, 9822620877

E-mail : ajanta2023@gmail.com, www.ajantaprakashan.in

**IDEAL - ISSN 2319 - 359X - Impact Factor - 7.537** (www.sjifactor.com)

# EDITORIAL BOARD


**Mehryar Adibpour**
Faculty of Computing London
Metropolitan University,
Holloway Road, London.

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science,
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

**Dr. Altaf Husain Pandi**
Dept. of Chemistry University
of Kashmir, Kashmir, India.

**Dr. Ramdas S. Wanare**
Associate Professor & Head Accounts & Applied Stat,
Vivekanand Art's Sardar Dalip Sing Commerce
& Science College Samarth Nagar, Aurangabad (M.S.)

**Dr Harish Kumar**
Assistant Professor Department of History,
Mangalayatan University, Extended,
Ncr 33rd Milestone, Mathura - Beswan
Aligarh (U.P.) 202146.

**Dr. P. A. Koli**
Professor & Head (Retd),
Dept. of Economics, Shivaji University,
Kolhapur - (M.S.) India.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean School for Environment Science,
Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar University
of Raebareily, Lucknow- India.

**Dr. Joyanta Barbora**
Head Dept. of Sociology University of
Dibrugarh- India.

**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D., SNJB College of Pharmacy,
Neminagar, Chandwad, Nashik (M.S.) - India.

**Prof. P. N. Gajjar**
Head, Dept. of Physics,
University of School of Sciences,
Gujarad University, Ahmedabad- India.

**Dr. Binoy Musahary**
Department of Political Science,
Nalbari College, Nalbari Assam, P. O. Bidyapur.

**Dr. Prashant M. Dolia**
Dept. of Computer Science and Applications,
Bhavnagar University, India.

**Dr. S. Jeyakumar**
Assistant Professor, PG & Research Department of
Commerce, P. M. T. College, Melaneelithanallur,
Sankarankovil Tirunelveli, Tamil Nadu.

**Dr. P. S. Buvaneswari**
Asst. Professor of Commerce,
University of Madras Chepauk, Chennai-05.

**Dr. (CA) Subrahmanya Bhat K. M.**
Principal, Department of Commerce,
Swami Vivekananda College, Borim Ponda, Goa.

**Dr. G. B. Lamb**
Associate Professor & Head,
Department of Mathematics
Baliram Patil College, Kinwat, Dist.Nanded. (M.S.)

# EDITORIAL BOARD


**Dr. Priyanka A. Masatkar**
Assistant Professor, Dept. of Botany,
Ghulam Nabi Azad Arts Commerce and
Science College, Barshitakli, Akola, Maharashtra..

**Dr. Dhirajkumar S. Kotme**
Head, Department of Marathi,
Jaikranti Airts & Com. Sr. College,
Latur. (Maharashtra)

**Dr. Taresh Agashe**
In - Charge Principal,
Ghulam Nabi Azad Arts, Commerce & Science
College, Barshitakli, Dist. Akola. (M.S.).

**Prof. Sudhir Raut**
Head Department of Commerce,
Ghulam Nabi Azad Arts, Commerce &
Science College, Barshitakli, Dist. Akola. (M.S.)

**Dr. Pravinkumar Rathod**
Department of English, Ghulam Nabi Azad
Arts, Commerce & Science College, Barshitakli,
Dist. Akola. (M.S.)

**Dr. Praveen Deshmukh**
Head Department of Hindi,
Ghulam Nabi Azad Arts, Commerce &
Science College, Barshitakli, Dist. Akola. (M.S.)

**Dr. Mohan Ballal**
Department of English,
Ghulam Nabi Azad Arts, Commerce &
Science College, Barshitakli, Dist. Akola. (M.S.)

**Dr. Bismillah Khan**
Head Department of Urdu,
Ghulam Nabi Azad Arts, Commerce &
Science College, Barshitakli, Dist. Akola. (M.S.)

**Dr. Anilkumar Dadmal**
Head Department of Marathi,
Ghulam Nabi Azad Arts, Commerce &
Science College, Barshitakli, Dist. Akola. (M.S.)

**Asst. Prof. Raju Sarkate**
Head Department of Music,
Ghulam Nabi Azad Arts, Commerce &
Science College, Barshitakli, Dist. Akola. (M.S.)

**Prof. Dr. Kailash Nagulkar**
Head Department of History,
Ghulam Nabi Azad Arts, Commerce &
Science College, Barshitakli, Dist. Akola. (M.S.)

**Prof. Dr. Santosh Hushe**
Head Department of English,
Ghulam Nabi Azad Arts, Commerce &
Science College, Barshitakli, Dist. Akola. (M.S.)

**Dr. Dhanraj Khirade**
Head Department of Economics,
Ghulam Nabi Azad Arts, Commerce &
Science College, Barshitakli, Dist. Akola. (M.S.)

**Prof. Dr. Sunil Kolhe**
Head Department of Music,
Ghulam Nabi Azad Arts, Commerce &
Science College, Barshitakli, Dist. Akola. (M.S.)

**Dr. Manojkumar Deshpande**
Department of Music,
Ghulam Nabi Azad Arts, Commerce &
Science College, Barshitakli, Dist. Akola. (M.S.)

**Dr. Vaishali Kotambe**
Head Department of Marathi,
Ghulam Nabi Azad Arts, Commerce &
Science College, Barshitakli, Dist. Akola. (M.S.)

# EDITORIAL BOARD

**Miss. Vaishali Sonone**
Department of Hindi,
Ghulam Nabi Azad Arts, Commerce &
Science College, Barshitakli, Dist. Akola. (M.S.)

**Dr. Manoj Jadhav**
Department of English,
Ghulam Nabi Azad Arts, Commerce &
Science College, Barshitakli, Dist. Akola. (M.S.)

**Dr. Deepak Chaurpagar**
Department of Social Science,
Ghulam Nabi Azad Arts, Commerce &
Science College, Barshitakli, Dist. Akola. (M.S.)

VOLUME - XII, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2024
IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 7.537 (www.sjifactor.com) CC - 5

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासातील समस्या व आव्हाने<br>**डॉ. संजय उद्धवराव देशमुख** | १-४ |
| २ | भाषा आणि आजची मराठी (Trends)<br>**डॉ. दीपाली प्र. गावंडे** | ५-९ |
| ३ | वर्तमान जिवनस्थित संगीत वादन कलेचे महत्त्व<br>**प्रा. संतोष मुकिंदा धंदरे** | १०-१२ |
| ४ | राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाअंतर्गत उच्च शिक्षणात सामाजीक शास्त्रातील बदलते प्रवाह<br>**डॉ. पदमानंद मनोहर तायडे** | १३-१८ |
| ५ | वर्तमान संगीत आणि बदलते सांगीतिक प्रवाह<br>**प्रा. डॉ. हर्षवर्धन मानकर** | १९-२० |
| ६ | ग्रामीण महिलांची वैवाहिक स्थिती, दर्जा व उपाय<br>**प्रा. डॉ. दिपक आ. चौरपगार** | २१-२४ |
| ७ | सामाजिक कार्यात उदयोन्मुख तंत्रज्ञान: पारंपारिक आणि आधुनिक हस्तक्षेपांसमोरील उपाय आणि आव्हाने<br>**प्रा. डॉ. बळवंत पाटील** | २५-३५ |
| ८ | ग्रामीण महिलांच्या समस्या व त्यावर उपाय<br>**प्रा. सौ. राजश्री अशोक राठोड (पवार)** | ३६-४० |
| ९ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या अंधश्रद्धेविषयी गीतांचे विश्लेषण<br>**श्री. गणेश अ. सरोदे**<br>**प्रा. डॉ. सुनील कोल्हे** | ४१-४४ |
| १० | आधुनिक युगातील भारतीय संगीतात झालेला बदल आणि विकास<br>**प्रा. डॉ. प्रतिभा चंद्रहास्य पवित्रकार** | ४५-४९ |
| ११ | संगीत चिकित्सेचा मानवी जीवनावर सकारात्मक परिणाम<br>**डॉ. मृणाल प्रभारराव कडू** | ५०-५३ |
| १२ | शास्त्रीय संगीत शिक्षण आणि व्यवसायाच्या दिशा<br>**प्रा. डॉ. सुनील पारीसे** | ५४-५८ |

VOLUME - XII, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2024
**IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 7.537** (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | अण्णसाहेब किर्लोस्कर यांचे नाट्यसंगीतामधील योगदान<br>**विद्या प्र. गावंडे** | ५९-६१ |
| १४ | आजची मानवी सृष्टी व प्रदूषणाचा परिणाम<br>**प्रा. डॉ. स्वाती गिरासे** | ६२-६४ |
| १५ | "गुरुवंदना" एक निरंतर प्रवास : गुरूंच्या प्रती देण्यात येणारी सांगीतिक "मानवंदना"<br>**प्रा. वनिता संजय मोहोड** | ६५-६७ |
| १६ | जागतिकीकरण आणि मराठी भाषा<br>**प्रा. डॉ. अनिल दडमल** | ६८-७२ |
| १७ | नवदोत्तर वैदर्भीय ग्रामीण कादंबरीतील नवजाणिवा<br>**प्रा. डॉ. गजानन मुंधे** | ७३-७६ |
| १८ | नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरी : नव्या जाणिवा<br>**प्रा. डॉ. विनोद नामदेव इंगळे** | ७७-८५ |
| १९ | एकविसावे शतक : मराठी भाषा, संस्कृती आणि भाषांतर<br>**प्रा. डॉ. अरविंद विजय हंगरगेकर** | ८६-९० |
| २० | भारताचा पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल<br>**श्री. एस. एस. तायडे** | ९१-९३ |
| २१ | भारतात वस्तु आणि सेवा कर प्रणाली (GST)<br>**प्रा. डॉ. विष्णु ब. पवार** | ९४-९६ |
| २२ | भारतीय शास्त्रीय संगीतातील बदलते प्रवाह<br>**डॉ. उत्तरा तडवी (प्रधान)** | ९७-१०२ |
| २३ | भारतीय समाजा समोरील भ्रष्टाचार : एक आव्हान<br>**प्रा. राजेश आर. पाटील** | १०३-१०६ |
| २४ | संत शिरोमणी मन्मथ माऊली यांचे सामाजिक, सांगितिक कार्याचा आधुनिक सामाजिक जीवनावर परिणाम<br>**कैलास राजेश्वर भुरे** | १०७-११३ |
| २५ | श्रीचक्रधर निरूपित कथेतील संवाद व नाट्य<br>**डॉ. माधुरी मनोहरराव पाटील** | ११४-११८ |

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २६ | सामाजिक शास्त्रातील सामाजिक नियम व मूल्यातील बदल<br>**डॉ. सुजाता नाईक** | ११९-१२४ |
| २७ | सामाजिक संशोधनात संगणकाचे महत्त्व<br>**डॉ. बळीराम परशराम अवचार** | १२५-१३३ |
| २८ | सोशल मीडियाचे समाज व्यवस्थेवर परिणाम : एक अध्ययन<br>**प्रा. अभिजीत महेंद्र मुळे** | १३४-१३६ |
| २९ | भावनिक बुद्धिमत्ता आणि स्व-जाणीवेचे विद्यार्थी जीवनात महत्व<br>**शालिनी परशुराम पवार**<br>**प्रा. डॉ. शेख तहेमिना नाज** | १३७-१४२ |
| ३० | सद्यस्थितीतील तथागतांच्या आर्य आष्टांगिक मार्गाची गरज<br>**आम्रपाली शेषराव खरात**<br>**डॉ. रिना रमेश सुरडकर** | १४३-१४८ |
| ३१ | दिव्य प्रतिभा लाभलेले कवि कुसुमाग्रज<br>**प्रा. डॉ. वैशाली बाबुराव कोटंबे** | १४९-१५४ |
| ३२ | पाली साहित्यात प्रतिबिंबित तृष्णा संकल्पना<br>**वैशाली सखाहरी गवई**<br>**प्रा. डॉ. शिल्पा डी. जिवरग** | १५५-१५९ |
| ३३ | संवादिनीचा विकास व आधुनिक काळात संवादीनीच्या प्रचारात पं.आप्पासाहेब जळगावकर यांचे योगदान<br>**चंद्रमणी मोतीराम मोहोड**<br>**प्रा. डॉ. मनोजकुमार धों. देशपांडे** | १६०-१६४ |
| ३४ | संत शिरोमणी मन्मथ माऊली यांचे सामाजिक, सांगितिक कार्याचा आधुनिक सामाजिक<br>**जीवनावर परिणाम**<br>**कैलास राजेश्वर भुरे** | १६५-१७१ |

VOLUME - XII, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2024
IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 7.537 (www.sjifactor.com) CC - 5

# १. भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासातील समस्या व आव्हाने

**डॉ. संजय उद्धवराव देशमुख**
प्राध्यापक (वाणिज्य विभाग), श्रीमती. राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, ता. अंजनगाव सुर्जी, जि., अमरावती.

**गोषवारा**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून विकास होत असलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेला अनेक समस्यांना समोरे जावे लागत आहे. सत्तेला प्राथमिकता व विकासाला दुय्यम स्थान देणाऱ्या राज्यकर्त्यांना ह्या समस्या माहिती असुन सुध्दा समस्या सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न झालेला दिसून येत नाही. भ्रष्टाचार व लालफितशाहीमुळे गुणवत्तेला कमी महत्व देण्यात आले. भारतीय अर्थव्यवस्थेच्या काही आर्थिक समस्या वर्षानुवर्षे जसाच्या तशा पाहावयास मिळत आहेत. जसे वाढती लोकसंख्या, ग्रामीण व शहरी बेरोजगारी ह्या समस्या विकासामध्ये व्यत्यय निर्माण करीत आहेत. लोकसंख्या वाढल्यामुळे बाल-वृध्द यांचे वाढलेले प्रमाण, बेरोजगार यांच्या गरजा भागवण्यावर कार्यकारी लोकांना आपले उत्पन्न खर्च करावे लागत आहे. सरकारला सुध्दा या वर्गासाठी शिक्षण, आरोग्य, वीज, दळणवळण इ. या सारख्या सुविधा पुरविण्यावर निधी खर्च करावा लागत आहे. त्यामुळे विकासासाठी भांडवल निर्मीती पुरेशी होतांना दिसुन येत नाही. विकास संरचनेचा अभाव, लालफितशाही, भ्रष्टाचार यामुळे देशी व विदेशी गुंतवणूक होण्यामध्ये अडथळे येत आहेत. परिणामता गुंतवणूकी अभावी देशाचा आर्थिक विकास धिम्यागतीने होत आहे. भारतामध्ये सुपीक जमीन, पाणी, मानवी संसाधन मुबलक प्रमाणात असतांना सुध्दा शेती क्षेत्रामधून पुरेशी भांडवल निर्मीती होतांना दिसत नाही. शेती व्यवसाय हा कुटुंबाच्या उदरनिर्वाहाच्या गरजा भागविण्याचा व्यवसाय दिसुन येतो. भारतीय शोधनशेष हा वर्षानुवर्षे प्रतिकुल असा आहे. देशावर जागतिक संस्थांचे विदेशी कर्ज दिवसेंदिवस वाढतच आहे. अलीकडे मात्र अर्थव्यवस्था आत्मनिर्भर बनवण्याची योजना केंद्रसरकारने केलेली आहे परंतु वरील काही प्रमुख समस्या लक्षात घेता नजीकच्या काळात भारतीय अर्थव्यवस्था आत्मनिर्भर होणे शक्य नाही असेच दिसते.

**प्रस्तावना**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरुप हे समाजवादी मीश्रीत अर्थव्यवस्थेचे होते. परंतु १९९१ नंतर मात्र भारतीय अर्थव्यवस्था ही भांडवलशाही समाजवादी अर्थव्यवस्था म्हणून उदयास आली. स्वातंत्र्यप्राप्ती पासुन भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये उतार-चढाव दिसुन येतात. स्वातंत्र्य प्राप्ती नंतर पंचवार्षीक योजनांच्या माध्यमातून नियोजीत पध्दतीने भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाला प्रारंभ झाला. मात्र दरम्यान कृषीच्या बाबतीत हरीतक्रांतीचे धोरण अवलंबिल्या गेले. कृषीमध्ये आमुलाग्र बदल दिसून आले. जसे संकरीत बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके इ. वापरामुळे उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये प्रा. महालनोबीस यांच्या विकास मॉडेलचे आधारे पायाभुत उद्योगांच्या विकासाला चालना देण्यात आली. याच कालावधीमध्ये भारताचे पाकीस्तान व चीन सोबत युध्द झाले. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाला खिळ बसली. भारतीय अर्थव्यवस्थेच्यां विकासामध्ये बेकारी दुर करण्याचे प्रयत्न केले गेले. बँकींग क्षेत्रावर नियंत्रण करण्याकरीता बँकाचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. सन १९९०-१९९२ मध्ये मंदीची झळ भारतीय अर्थव्यवस्थेला सोसावी लागली. याच कालावधीमध्ये उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण ह्या संकल्पना भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये स्वीकारल्या गेल्या. १ जानेवारी २०१५ ला योजना आयोग हे

नाव बदलून निती आयोगाची स्थापना करण्यात आली. सन २०१९-२०२० चा काळ हा जागतिक कोरोना महामारीचा काळ म्हणून ओळखला जातो. या कोरोना महामारीचा फटका इतर अर्थव्यवस्था प्रमाणे भारतीय अर्थव्यवस्थेला सुध्दा बसला. याकाळात विकासदर प्रतीकुलरित्या प्रभावित झाला. आज भारतीय अर्थव्यवस्था आत्मनिर्भर करण्याबाबत केंद्र सरकार प्रयत्नशिल आहे. भारतीय अर्थव्यवस्था स्वातंत्र्या पासुन आजपर्यंत प्रगतीपथावर आहे. परंतु आज सुध्दा भारतीय अर्थव्यवस्था आत्मनिर्भर बनु शकली नाही. आर्थीक विकासामध्ये अनेक आर्थिक घटक हे अडथळा निर्माण करतांना दिसत आहेत. त्यांना प्रतिबंध करणे किंवा त्यांचे विकासामध्ये योगदान कसे होईल यासाठी प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे.

**उद्दिष्ट्ये**

भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासामधील अडथळे जाणुन घेणे.

**गृहितके**

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये वाढती लोकसंख्या, भ्रष्टाचार, बेकारी, विकास संरचनेमधील कमतरता इ. समस्यांचा सामना करावा लागत आहे.

**संशोधन पध्दती**

सदर अध्ययनाकरीता द्वितीयक तथ्य संकलन पध्दतीचा आधार घेतलेला आहे. पुस्तके व इंटरनेट वरुन मिळालेल्या माहीतीचा उपयोग संशोधनाकरीता करण्यात आला आहे.

**परिणाम व चर्चा**

वर्तमान स्थितीमध्ये भारताच्या एकुण लोकसंख्येपैकी २५% लोक हे अतिशय गरीब परिस्थितीमध्ये दारिद्र्याचे जीवन जगत आहेत. आर्थिक विकास होत असतांना उत्पन्नाचे वितरण असमान होत असल्याचा तो सबळ पुरावा आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत मुबलक प्रमाणात उपलब्ध असलेली सुपीक जमीन, खनीज संपत्ती, पाणी इ. नैसर्गीक संसाधनाचा पुरेपुर वापर विकासामध्ये होतांना दिसून येत नाही. अशीच परिस्थिती मानवी संसाधनाबाबत सुध्दा दिसुन येते. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक विषमता सुध्दा मोठ्या प्रमाणावर दिसुन येते. भारतीय अर्थव्यवस्थे समोरील प्रमुख समस्या ह्या पुढील प्रमाणे सांगता येतात.

**वाढती लोकसंख्या**

ही भारतीय अर्थव्यवस्थेसमोरीलल प्रमुख समस्यांपैकी एक आहे. भारत हा आज जगात लोकसंख्येच्या बाबतीत प्रथम क्रमांकाचा देश आहे. भारतीय लोकसंख्येमध्ये बालक, वृध्द व बेरोजगार यांचा समावेश मोठ्या प्रमाणात असल्यामुळे कार्यकारी लोकांवर याचा भार आहे. या लोकांचा देशाच्या प्रगतीला कसलाही हातभार लागत नाही. वाढता जननदर व घटता मृत्युदर यामुळे लोकसंख्येमध्ये झपाट्याने वाढ झाल्याचे दिसून येते. सरकारला वाढत्या लोकसंख्येच्या अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण ह्या मुलभूत गरजा भागविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करावा लागत आहे. त्यामुळे सरकार विकासाला हातभार लागणाऱ्या महत्वपुर्ण योजना साकरु शकत नाही.

**बेरोजगारी -** ही भारतीय अर्थव्यवस्थे समोरील मोठी समस्या आहे. भारतामध्ये शहरी व ग्रामीण बेकारी मध्ये वाढ झालेली पाहावयास मिळते. अलीकडे कोवीड-१९ च्या काळात लॉकडाउन मध्ये १.८ करोड पेक्षा जास्त लोकांना कामावरुन काढून टाकण्यात आले. ऑगष्ट २०१९ मध्ये बेरोजगारी दर ४.१% इतका होता, ऑगष्ट २०२० मध्ये हा दर ७.४% पर्यंत पोहचला. ग्रामीण भागामध्ये

शेती क्षेत्रामध्ये छुपी बेकारी मोठ्या प्रमाणात आढळून येते. देशाच्या द्वितीय व तृतीय क्षेत्राचा धीम्यागतीने होत असलेला विकास बेकारांना आवश्यक त्या प्रमाणात रोजगार पुरवु शकत नाही.

**भांडवल निर्मीतीचा दर कमी** - देशांतर्गत विविध कारणास्तव भांडवल निर्मीती पुरेशा प्रमाणात होताना दिसुन येत नाही. कार्यकारी लोकांवर अवलंबुन असणाऱ्या वृध्द, बालक व बेकारांमुळे कार्यकारी लोक आपल्या उत्पन्नातुन बचत करु शकत नाहीत. तसेच वाढत्या महागाईमुळे मध्यमवर्गीय लोकांचे उत्पन्न वस्तु व सेवा खरेदीवर खर्च होते. या वर्गाची बचत होत नसल्यामुळे सुध्दा भांडवल निर्मीती कमी प्रमाणात होतांना दिसुन येते. भांडवला अभावी गुंतवणूक व रोजगार सुध्दा न्युन पातळीवर असलेला दिसुन येतो.

**नविन तंत्रज्ञान व कुशल मनुष्यबळाची कमतरता** - उत्पादनाच्या क्षेत्रामध्ये नविन तंत्रज्ञानाचा शोध व वापर ही नित्याची बाब झालेली आहे. हे नविन तंत्रज्ञान विकत घेण्यासाठी निधीची आवश्यकता असते. तसेच नविन तंत्रज्ञान वापरण्यासाठी कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असते. भारतीय अर्थव्यवस्थेत ह्या दोन्ही बाबींच्या अभावी विकासामध्ये अडथळे येतांना दिसुन येतात.

**शेतीची कमी उत्पादकता** - वारसा हक्कामुळे शेतीचे झालेले लहान सहान तुकड्यामध्ये विभाजन, शेतीच्या लहान आकारामुळे शेतकऱ्याची शेती बाबतची उदासीनता, आधुनिक पध्दतीने शेती करण्याबाबतचे अज्ञान किंवा पैशाची कमतरता इ. अनेक कारणामुळे भारतीय शेती ही उदरनिर्वाहाचे साधन बनुन राहली आहे. यासर्व कारणामुळे शेतीची उत्पादकता सुध्दा कमी राहत आहे. परिणामता वर्षानुवर्षे शेतकरी पुरेशा उत्पन्ना अभावी कर्जबाजारी राहत असुन हालाखीचे जीवन जगत आहे.

**प्रभावी मागणी अभाव** - कोणत्याही अर्थव्यवस्थेचा विकासासाठी उत्पादनाला मागणी येणे फार महत्वाचे आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत उत्पन्न वाढी मधील कमतरता, वाढती महागाई, वाढती बेरोजगारी, कोरोना महामारी इ. कारणामुळे वस्तु सेवांच्या मागणीमध्ये घट झाल्याचे पाहावयास मिळते. त्याचा परिणाम उपभोग कमी होवुन गुंतवणूक सुध्दा कमी होते.

**विकास संरचना** - आजही भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये सडक, रेल्वे, बंदरे, विज, पाणी, स्वच्छता यासारख्या विकास संरचनेचा अभाव दिसुन येतो. त्यामुळे विदेशी व देशी गुंतवणूक होण्यामध्ये अडचण निर्माण होतांना दिसते. लोकांचे जीवनमान व आरोग्य यावर सुध्दा त्याचा विपरीत परिणाम झालेला आढळून येतो.

**आयात-निर्यात** - भारतीय आयात ही निर्यातीपेक्षा जास्त झाल्याचे पाहावयास मिळते. त्यामुळे शोधनशेष प्रतीकुल होतो. वर्ष २०२२ मध्ये निर्यात ९.५९% ने कमी झालेली असुन आयात ३.६३% ने कमी झाल्याचे दिसते.

**भ्रष्टाचार** - भारतामध्ये राज्यकर्ते/शासनकर्ते भ्रष्ट असल्यामुळे संपूर्ण अर्थव्यवस्था भ्रष्टाचाराने व्यापलेली दिसुन येते. स्वत:चे स्वार्थासाठी राज्यकर्ते आपल्या पदाचा दुरुपयोग करतांना आढळून येतात. भ्रष्टाचार करणाऱ्या व्यक्तीला दंड किंवा शिक्षा देण्याची चोख व्यवस्था नसल्यामुळे भ्रष्टाचार सर्वत्र दिसुन येतो. राज्यकर्ते भ्रष्ट असल्यामुळे त्यांच्या अधिपत्याखाली कार्य करणारी यंत्रणा सुध्दा काही अपवाद वगळता भ्रष्ट आहे. भारतीय अर्थव्यवस्थेतील भ्रष्टाचारामुळे विदेशी गुंतवणूकदाराना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे विदेशी गुंतवणूक कमी प्रमाणात होतांना दिसते. उद्योग व्यवसायाच्या उभारणीकरीता वेगवेगळया संस्थाचे परवाने आवश्यक असतात. भ्रष्टाचारामुळे हे परवाने मिळण्यास उशीर लागतो. त्यामुळे उद्योग व्यवसाय उभे राहण्यास वेळ लागतो व विकासाची गती मंद होते.

**निष्कर्ष**

भारतीय अर्थव्यवस्था विकसनशील स्थिती कडून विकसीत स्थितीमध्ये येण्यास बऱ्याच समस्यांचा सामना करीत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे कार्यकारी लोकांचे व सरकारचे उत्पन्न बाल-वृध्द-बेकार यांच्या आवश्यक गरजांच्या पूर्तीकरीता खर्च होत आहे.

त्यामुळे विकासाकरीता निधी कमी पडत आहे. परिणामत: विदेशी मदत अथवा कर्जाचा डोंगर उभा झालेला पाहावयास मिळतो. शेतीची कमी उत्पादकता असल्यामुळे शेती ही उदरनिर्वाहाचे साधन बनुन आहे. विकास संरचना पुरेशी नसल्यामुळे उद्योग-व्यवसाय उभे राहण्यात अडचणी निर्माण होत आहेत. भ्रष्टाचार ही भारतीय अर्थव्यवस्थे समोरील गंभीर अशी समस्या आहे. भ्रष्टाचारामुळे गुणवत्तेला वाव मिळत नाही. आणि गुणवत्ते शिवाय विकास होवू शकत नाही. भ्रष्टाचारामुळे उद्योग-व्यापार-व्यवसाय उभे करण्यासाठी जे परवाने लागतात त्यासाठी विलंब लागतो. त्यामुळे देशी-विदेशी गुंतवणूकीमध्ये अडथळे येतात आणि आर्थिक विकास प्रतिकूलरित्या प्रभावी होतो.

**संदर्भ**

१. भारतीय अर्थव्यवस्था - रमेश सिंह

२. www.gogle.com